इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

कार्यक्रम पत्रिका क्र. (३/२०२६)
सर्वसाधारण सभा

प्रति. दि. १२/०५/२०२६

मा. ---------------------------------------------------------------
नगरसेवक / नगरसेविका,
इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

महोदय,

इचलकरंजी महानगरपालिकेच्या मा. सदस्य यांना नोटीस देणेत येते की इचलकरंजी महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा बुधवार दि. २०/०५/२०२६ रोजी दुपारी १२ : १५ वाजता इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे भरविणेत येत आहे.

तरी सदर सभेस उपस्थित राहणेबद्दल आपणास विनंती करणेत येत आहे.

## परिशिष्ठ

विषय क्र. १ : मागील सभा दि. ३०/०४/२०२६ इ. रोजी झालेल्या मा. महासभेचे इतिवृत्त कायम करणे.

विषय क्र. २ : इचलकरंजीचे अधिपती कै. श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे यांचा नाट्यगृहा शेजारचा पुतळा सुशोभिकरण करणेस व आधुनिक विद्युत व्यवस्था इ. सुविधा करणेबाबत अविनाश गुलचंद कांबळे, नगरसेवक यांनी मागणी केलेबाबत कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

विषय क्र. ३ : इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं. १६ सि. स. नं. १८०६० गट नं. ६३३ या ठिकाणी विकसीत करणेत आलेल्या मल्टीपर्पज हॉल व गार्डन परिसरातील रिकाम्या जागेत जगज्योती महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा उभा करणे बाबत विरशैव उत्कर्ष मंडळ यांनी मागणी केलेबाबत कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

विषय क्र. ४ : जवाहर नगर इचलकरंजी येथील आदर्श झोपडपट्टीस "आदर्श कॉलनी" व वडार झोपडपट्टीस "वडार भाऊ बंधु समाज" असे नामकरण करणेस तसेच आबा पोवार देशी दारु दुकान समोरील चौकास "कै. संतोष जाधव तात्या प्रेमी चौक" असे नामकरण करणेबाबत सतिश वसंतराव मुळीक, सभापती स्थायी समिती यांनी मागणी केलेबाबत कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

विषय क्र. ५ : यड्राव फाटा ते पंचगंगा फॅक्टरी रोड येथील शहापुर ओढयामध्ये चिकन दुकानदार चिकन व चिकन ६५ तसेच परिसरातील रहिवासी रात्रीच्या वेळेस कचरा टाकत असल्यामुळे सदर परिसरात दुर्गंधी पसरत असलेने व मोकाट कुत्र्यांचा वावर वाढल्याने उघड्यावर चिकन व चिकन ६५ तसेच कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करणेबाबत रुपाली नितीन कोकणे, नगरसेविका यांनी मागणी केलेबाबत कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

विषय क्र. ६ : स्वच्छ भारत अभियान घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत मृत जनावारांच्या शरीराची विल्हेवाट लावणेसाठी आधुनिक, पर्यावरण पुरक व शास्त्रोक्त उपाययोजना म्हणुन रि. स. नं. ६३८ घनकचरा प्रक्रिया केंद्र या ठिकाणी विद्युत दाहिनी उभारणेबाबत कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

विषय क्र. ७ : इचलकरंजी महानगरपालिकेची उद्याने व ऑक्सीजन पार्क यांच्या देखभाल व संवर्धनासाठी गठीत केलेल्या समितीने निश्चित केलेल्या कार्यपद्धतीस मा. महासभेची मंजुरी देणेबाबत कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

Scanned with OKEN Scanner

विषय क्र. ८ : कबनुर गट नं १३३ अ २ मधील रेखांकनातील खुली जागा बगीचा, सांस्कृतीक केंद्र, व्यायामशाळा, ऑक्सिजन पार्क इ. सुविधांकरीता विकसीत करणेस तसेच भविष्यात देखभालीचा खर्च करणेस तयार असलेचे नमुद करुन सदर रेखांकनातील खुली जागा विकसित करणेस परवानगी देणे बाबत इचलकरंजी गुजराती समाज यांनी विनंती केलेबाबत कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

विषय क्र. ९ : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल प्रकरण ८ कराधान नियम २१ (२) नुसार इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील मिळकतींचे त्रयस्त एजन्सी मार्फत कर आकारणीचे मुल्यांकण करणेस व मिळकत धारकांना चतुर्थ वार्षिक कर आकारणीस अधिन राहुन मागणी बिले देणेस मंजुरी मिळणे बाबत कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

विषय क्र. १० : मा. महापौर यांचे परवानगीने घेणेत येणारे ऐनवेळचे इतर विषय.

---

मा. महापौर, इचलकरंजी महानगरपालिका यांचे
दि. १२/०५/२०२६ चे आदेशानुसार.

(राहुल बा. पोटे)
प्र.नगरसचिव
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०३
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ६३
दि. २०/०५/२०२६

विषय क्र. १ : मागील सभा दि. ३०/०४/२०२६ इ. रोजी झालेल्या मा. महासभांचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव**

मागील सभा दि. ३०/०४/२०२६ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त प्र. नगरसचिव यांनी सभेसमोर वाचुन दाखवले ते योग्य व बरोबर असलेने कायम करणेत येत आहे.

सूचक : ता. बा. पोवार.

अनुमोदक : स. व. मुळीक

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०३
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ६४
दि. २०/०५/२०२६

विषय क्र. २ : इचलकरंजीचे अधिपती कै. श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे यांचा नाट्यगृहा शेजारचा पुतळा सुशोभिकरण करणेस व आधुनिक विद्युत व्यवस्था इ. सुविधा करणेबाबत अविनाश गुलचंद कांबळे, नगरसेवक यांनी मागणी केलेबाबत कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

**ठराव**

विषयांकित कामी इचलकरंजी नगरीचे आद्य संस्थापक व इचलकरंजी संस्थांचे अधिपती कै.श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे यांचा पुर्नाकृती पुतळा महानगरपालिकेच्या श्रीमंत ना.वा.घोरपडे नाट्यगृहाच्या चौकात उभारणेत आलेला आहे. सदर पुतळ्याचे सुशोभीकरण व त्या परीसरामध्ये विद्युत व्यवस्था करावे म्हणून माजी आमदारसो, मा.प्रकाशआण्णा आवाडे यांनी नाट्यगृह नुतनीकरण कामाचे शुभारंभ प्रसंगी सुचना केल्या आहेत. तसेच याबाबत इचलरकंजी मनपाचे नगरसेवक, श्री. अविनाश कांबळे यांनी दि.२५/०३/२०२६ रोजीच्या पत्राने विनंती केलेली आहे. त्यानुसार बांधकाम विभागाकडून सदर पुतळा परिसराची पाहणी केली असता सदर ठिकाणच्या बांधकामाचे दगड पावसामुळे व बरेच दिवस देखभाल दुरूस्ती न केलेने त्यांचा रंग खराब झाला आहे. तसेच त्या ठिकाणची विद्युत व्यवस्था ही पुरेशी नाही. त्यामुळे सदर पुतळा परीसराचे सुशोभिकरण / नुतनीकरण करणे आवश्यक आहे. तसेच पुतळा पॉलिश करणेही गरजेचे आहे. तसेच विद्युत व्यवस्था करणेही गरजेचे आहे. तरी याकामी मनपा पॅनेल वरील प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचेकडून सुशोभिकरण कामाचे आराखडे करून घेणे योग्य असलेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे. कै. श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे यांचा पुतळा सुशोभिकरणाकामी अमर राजाराम जाधव यांनीही पत्र दिले आहे.

तरी कै. श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे यांचा पुतळा परिसराची दुरुस्ती व पुतळा सुशोभिरणाकामी मनपा पॅनेल वरील प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचेकडून सुशोभिकरण कामाचे आराखडे करून घेणेस व सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करुन पुढील कार्यवाही करणेस मंजुरी देणेत येत आहे.

तसेच मा. ता.बा. पोवार, सदस्य यांनी केले सुचनेनुसार राजर्षी छत्रपती शाहु महराज व भारतरत्न डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांचे पुतळेही सुशोभिकरण करणेची मागणी केले नुसार सदर पुतळयांसाठीही मनपा पॅनेल वरील प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचेकडून सुशोभिकरण कामाचे आराखडे करून घेणेस व सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करुन पुढील कार्यवाही करणेत यावी.

सूचक : Satish स. व. मुळीक

अनुमोदक : A.P. Bachate सौ. अ. प्र. बचाटे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०३
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ६५
दि. २०/०५/२०२६

विषय क्र. ३ : इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं. १६ सि. स. नं. १८०६० गट नं. ६३३ या ठिकाणी विकसित करणेत आलेल्या मल्टीपर्पज हॉल व गार्डन परिसरातील रिकाम्या जागेत जगज्योती महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा उभा करणे बाबत विरशैव उत्कर्ष मंडळ यांनी मागणी केलेबाबत कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं. १६ सि. स. नं. १८०६० गट नं. ६३३ या ठिकाणी विकसित करणेत आलेल्या मल्टीपर्पज हॉल व गार्डन परिसरातील रिकाम्या जागेत जगज्योती महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा उभा करणे बाबत विरशैव उत्कर्ष मंडळ यांनी मागणी केली आहे.

इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं.१६ C.S.N. १८०६० गट नं.६३३ या रिकाम्या जागेवर मल्टीपर्पज हॉलचे बांधकाम, कंपौंड व गार्डन विकसित करणे, गेट, रंगकाम व आर.सी.सी. कमान तयार करणे इत्यादी कामे पुर्ण करणेत आलेली आहेत. तसेच मा. शासन निर्णयान्वये इचलकरंजी येथील सांगली नाका येथे जगज्योती महात्मा बसवेश्वर परिसर विकसति करणे या कामासाठी र.रु. १ कोटी इतका निधी मंजुर झालेला आहे. सदर कामाचा सविस्तर प्रस्ताव तयार करणेची कार्यवाही बांधकाम विभागाकडुन सुरु आहे.

वीरशैव उत्कर्ष मंडळ, इचलकरंजी यांनी सदर विकसित ठिकाणी श्री.जगत ज्योती बसवेश्वर महाराज यांचे स्मारक व पुतळा उभारणेची मागणी केलेली आहे.

तरी वीरशैव उत्कर्ष मंडळ, इचलकरंजी यांचे मागणीप्रमाणे इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं.१६ C.S.N. १८०६० गट नं.६३३ या ठिकाणी विकसित करणेत आलेल्या मल्टीपर्पज हॉल व गार्डन परिसरातील रिकाम्या जागेत जगज्योती महात्मा बसवेश्वर यांचा अश्र्वारुढ पुतळा उभा करणेस मंजुरी देणेत येत आहे.

तसेच ॲड. अलका अशोक स्वामी, सदस्या यांनी इचलकरंजी शहरातील चांदणी चौक येथेही महात्मा बसवेश्वर यांचा अश्र्वारुढ पुतळा उभा करणेबाबत केलेल्या सुचनेकामी प्रशासनाने मा. महासभेकडे प्रस्ताव सादर करावा.

सूचक : दा. बा. पोवार.

अनुमोदक : स. व. सुळीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०३
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ६६
दि. २०/०५/२०२६

विषय क्र. ४ : जवाहर नगर इचलकरंजी येथील आदर्श झोपडपट्टीस "आदर्श कॉलनी" व वडार झोपडपट्टीस "वडार भाऊ बंधु समाज" असे नामकरण करणेस तसेच आबा पोवार देशी दारु दुकान समोरील चौकास "कै. संतोष जाधव तात्या प्रेमी चौक" असे नामकरण करणेबाबत सतिश वसंतराव मुळीक, सभापती स्थायी समिति यांनी मागणी केलेबाबत कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

**ठराव**

जवाहर नगर इचलकरंजी येथील आदर्श झोपडपट्टीस "आदर्श कॉलनी" व वडार झोपडपट्टीस "वडार भाऊ बंधु समाज" असे नामकरण करणेस तसेच आबा पोवार देशी दारु दुकान समोरील चौकास "कै. संतोष जाधव तात्या प्रेमी चौक" असे नामकरण करणेबाबत सतिश वसंतराव मुळीक, सभापती स्थायी समिति यांनी मागणी केली आहे.

इचलकरंजी शहरातील जवाहर नगर परिसरामध्ये आदर्श झोपडपट्टी व वडार झोपडपट्टी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात नागरिक वास्तव्यास आहेत. परंतु या वस्त्यांच्या नावामध्ये झोपडपट्टी हा शब्द असल्यामुळे संबंधित परिसरावर नकारात्मक छाप पडत असून येथील नागरिकांना विविध वित्तीय संस्था, बँका तसेच फायनान्स कंपन्याकडून कर्ज, आर्थिक सुविधा व इतर शासकीय लाभ मिळविताना अडचणींना सामना करावा लागत आहे. त्यामुळे या परिसरांची ओळख सकारात्मक व सन्मान जनक होणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी जवाहर नगर येथील आदर्श झोपडपट्टीस "आदर्श कॉलनी" व वडार झोपडपट्टीस "वडार भाऊ बंधु समाज" असे नामकरण करणेची मागणी केली आहे.

तसेच कै. संतोष जाधव हे एक सामाजिक कार्यकर्ते होते त्यांनी आपल्या कार्यकाळात समाजासाठी विविध उपक्रम राबविले असून सर्वसामान्य जनतेमध्ये अत्यंत आदरणीय व लोकप्रिय होते. त्यांच्या चांगल्या स्वभावामुळे व सामाजिक कार्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये त्यांच्याबद्दल विशेष आदराची भावना आहे त्यामुळे त्यांच्या स्मरणार्थ, जवाहर नगर येथील आबा पवार देशी दारू दुकान समोरिल चौकास कै. संतोष जाधव तात्या प्रेमी चौक असे नामकरण करणे बाबत पत्रानुसार मागणी केली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३ मधील पोट कलम (०९) नुसार * महानगर पालिकेमधील निहित असलेल्या रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नाव देणे किंवा त्यावर क्रमांक घालणे आणि अन्य जागावर क्रमांक घालणे * अशी तरतूद करणेत आलेली आहे. या तरतुदीस अनुसरून जवाहर नगर इचलकरंजी येथील आदर्श झोपडपट्टीस "आदर्श कॉलनी" व वडार झोपडपट्टीस "वडार भाऊ बंधु समाज" असे नामकरण करणे व आबा पवार देशी दारू दुकान समोरिल चौकास. कै. संतोष जाधव तात्या प्रेमी चौक असे नामकरण करणे कामी महासभेची मंजुरी मिळणेसाठी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी जवाहर नगर इचलकरंजी येथील आदर्श झोपडपट्टीस "आदर्श कॉलनी" व वडार झोपडपट्टीस "वडार भाऊ बंधु समाज" असे नामकरण करणेस मंजुरी देणेत येत आहे. तसेच इचलकरंजी शहरातील शासनाने घोषित केलेल्या सर्वच झोपडपट्यांना झोपडपट्टी या ऐवजी कॉलनी किंवा वसाहत / नगर असे नामकरण करणेत यावे व आबा पोवार देशी दारु दुकान समोरील चौकास "कै. संतोष जाधव तात्या प्रेमी चौक" असे नामकरण करणेऐवजी सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार सोनाली हॉटेल ते ज्योतिर्लिंग पान शॉप या रस्त्यास कै. संतोष जाधव मार्ग असे नामकरण करणेत यावे.

सूचक : A.P. Bachate सौ. अ. प्र. बचाटे अनुमोदक : Satish स. व. मुळीक.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०३ | ठराव क्र. ६७
सर्वसाधारण सभा | दि. २०/०५/२०२६

विषय क्र. ५ : यड्राव फाटा ते पंचगंगा फॅक्टरी रोड येथील शहापुर ओढयामध्ये चिकन दुकानदार चिकन व चिकन ६५ तसेच परिसरातील रहिवासी रात्रीच्या वेळेस कचरा टाकत असल्यामुळे सदर परिसरात दुर्गंधी पसरत असलेने व मोकाट कुत्र्यांचा वावर वाढल्याने उघड्यावर चिकन व चिकन ६५ तसेच कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करणेबाबत रुपाली नितीन कोकणे, नगरसेविका यांनी मागणी केलेबाबत कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

**ठराव**

यड्राव फाटा ते पंचगंगा फॅक्टरी रोड येथील शहापुर ओढयामध्ये चिकन दुकानदार चिकन व चिकन ६५ तसेच परिसरातील रहिवासी रात्रीच्या वेळेस कचरा टाकत असल्यामुळे सदर परिसरात दुर्गंधी पसरत असलेने व मोकाट कुत्र्यांचा वावर वाढल्याने उघड्यावर चिकन व चिकन ६५ तसेच कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करणेबाबत रुपाली नितीन कोकणे, नगरसेविका यांनी मागणी केली आहे.

यड्राव फाटा ते पंचगंगा फॅक्टरी रोड, येथील शहापूरच्या ओढ्यामध्ये. चिकन दुकानदार आणि परिसरातील रहिवासी रात्रीच्या वेळेस कचरा टाकत असल्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून मोकाट कुत्र्यांचा वावर वाढला आहे, जो नागरिकांच्या आरोग्यासाठी आणि सुरक्षिततेसाठी घातक आहे.

उघड्यावर चिकन व चिकन ६५ चा कचरा टाकणाऱ्यावर दंडात्मक कारवाई करणे आणि तो परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच खोतवाडी व तारदाळ भागातील नागरिकांनी उघड्यावर कचरा न टाकणेबाबत सदर ग्रामपंचायतींना पत्राद्वारे कळविणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी यड्राव फाटा ते पंचगंगा फॅक्टरी रोड येथील शहापुर ओढयामध्ये चिकन व चिकन ६५ व कचरा टाकणाऱ्यांवर रु. ५०००/- इतका दंड आकारणेस मंजुरी देणेत येत असुन याबाबतची उपविधी तयार करुन मा. महासभेसमोर मंजुरीसाठी सादर करणेत यावी. तसेच खोतवाडी व तारदाळ येथील नागरीकांनी शहापुर ओढा येथे कचरा टाकु नये यासाठी ग्रामपंचायतीने खबरदारी घ्यावी. यासाठी खोतवाडी व तारदाळ ग्रामपंचायत यांना पत्रानुसार कळविणेत यावे.

सूचक : A. P. Bachate सौ. अ. प्र. बचाटे

अनुमोदक : Satish स. व. कुळीक

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०३
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ६८
दि. २०/०५/२०२६

विषय क्र. ६ : स्वच्छ भारत अभियान घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत मृत जनावारांच्या शरीराची विल्हेवाट लावणेसाठी आधुनिक, पर्यावरण पुरक व शास्त्रोक्त उपाययोजना म्हणुन रि. स. नं. ६३८ घनकचरा प्रक्रिया केंद्र या ठिकाणी विद्युत दाहिनी उभारणेबाबत कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

**ठराव**

इचलकरंजी महानगरपालिका हद्दीमध्ये दैनंदिन विविध कारणांमुळे जनावरांचे मृत्यू होतात.त्यांच्या मृतदेहांची विल्हेवाट लावणे अत्यावश्यक असून सध्या या मृतदेहांची विल्हेवाट दफन पद्धतीने करण्यात येत आहे. तथापि, सद्यस्थितीत दफनासाठी उपलब्ध जागा अत्यंत मर्यादित असून ती अपुरी पडत आहे. उपलब्ध जागेवर वारंवार दफन केल्यामुळे त्या परिसरात दुर्गंधी, अस्वच्छता बाबत समस्या निर्माण होत आहेत. तसेच जमिनीत दफन केल्यामुळे भूजल प्रदूषणाची शक्यता नाकारता येत नाही.याव्यतिरिक्त, दफनासाठी नवीन जागा उपलब्ध नसल्याने सध्याची पद्धत दीर्घकालीन दृष्टीने शाश्वत नाही.

वरील परिस्थितीचा विचार करता, मृत जनावरांच्या शरीराची विल्हेवाट लावण्यासाठी आधुनिक, पर्यावरणपूरक व शास्त्रोक्त उपाय म्हणून रि. स. नं. ६३८ घनकचरा प्रक्रिया केंद्र या ठिकाणी विद्युत दाहिनी उभारणेस मंजुरी मिळणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी कार्यालयीन प्रस्तावानुसार मृत जनावारांच्या शरीराची विल्हेवाट लावणेसाठी आधुनिक, पर्यावरण पुरक व शास्त्रोक्त उपाययोजना म्हणुन रि. स. नं. ६३८ घनकचरा प्रक्रिया केंद्र या ठिकाणी विद्युत दाहिनी उभारणेस मंजुरी देणेत येत असुन सदर कामी CSR फंड, शासन निधी अथवा महानगरपालिका निधी यातुन खर्च करणेत यावा.

सूचक : Satish स. व. गुळीक

अनुमोदक : A.P. Bachate सौ. अ. प्र. बचाटे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०३
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ६१
दि. २०/०५/२०२६

विषय क्र. ७ : इचलकरंजी महानगरपालिकेची उद्याने व ऑक्सीजन पार्क यांच्या देखभाल व संवर्धनासाठी गठीत केलेल्या समितीने निश्चित केलेल्या कार्यपद्धतीस मा. महासभेची मंजुरी देणेबाबत कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

**ठराव**

सदर विषयास मा. उपमहापौर, इचलकरंजी महानगरपालिका यांचे पत्र क्र. ४६ दिनांक ११/०५/२०२६ प्राप्त झालेले आहे. सदर पत्रान्वये इचलकरंजी शहरातील महानगरपालिककेची उद्याने व ऑक्सिजन पार्क यांच्या देखभाल व संवर्धनासाठी गठित करण्यात आलेल्या समितीच्या कार्यपद्धतीस मा. महासभेची मान्यता मिळणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

मा. महासभेचा ठराव क्र. २९ दिनांक २५/०३/२०२६ अन्वये उद्याने व ऑक्सिजन पार्क यांच्या देखभाल व संवर्धनासाठी स्वतंत्र समिती गठित करण्यात आलेली असून सदर समितीमध्ये अध्यक्ष म्हणून ॲड. अनिल देवकरण डाळ्या तसेच सदस्य म्हणून गैबान परवेज लतीफ, बुगड रुपा उदय, जाधव अमरजित राजाराम, वाळवेकर अभिषेक रमाकांत यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर समितीची बैठक दिनांक १५/०४/२०२६ रोजी पार पडलेली असून समितीमार्फत उद्यानांची देखभाल, दुरुस्ती, वृक्षसंवर्धन, सुरक्षा व्यवस्था, स्वच्छता व्यवस्था तसेच नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या सूचना व तक्रारींचे निराकरण याबाबत सविस्तर कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने, इचलकरंजी महानगरपालिकेची उद्याने व ऑक्सिजन पार्क यांच्या देखभाल व संवर्धनासाठी गठित समितीने खालील प्रमाणे निश्चित केलेल्या कार्यपद्धतीस मान्यता मिळणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

**<u>उद्याने व ऑक्सिजन पार्क यांच्या देखभाल व संवर्धनासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीने निश्चित केलेली कार्यपद्धती</u>**

**१. अर्ज प्रक्रिया -**

> NGO / ट्रस्ट यांनाच अर्ज करता येईल. व्यक्तीशः अर्ज करु शकणार नाही.
> प्रथम येणाऱ्यास प्राधान्य असेल.
>NGO/ ट्रस्ट नोंदणीकृत असणे बंधनकारक असेल.

**२. करार आणि कालावधी (CONTRACT AND DURATION)-**

> कालावधी - सुरुवातीला हा करार ५ वर्षासाठी असावा.
> मुदतवाढ - संस्थेचे काम समाधानकारक आढळल्यासच पुढील मुदतवाढ देण्याचा अधिकार महानगरपालिकेला राहील.
> हस्तांतरण बंदी - संबंधीत संस्थेला हे उद्यान इतर कोणत्याही तिसऱ्या संस्थेला किंवा व्यक्तिला चालविण्यास (SUB-LAT) देता येणार नाही.

**३. प्रवेश आणि वापर (Public Entry & Usage) -**

> विनामुल्य प्रवेश - उद्यान सार्वजनिक मालमत्ता असल्याने ते सर्वसामान्य नागरिकांसाठी विनामुल्य खुले राहील. नागरिकांकडून कोणतेही प्रवेश शुल्क आकरता येणार नाही (शुल्क अकारायचे असल्यास पालिकेच्या महासभेची पुर्वपरवानगी बंधनकार राहील).
वेळापत्रक - महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या वेळेनुसारच उदयान उघड व बंद ठेवणे बंधनकारक असेल.
> वापरावर निर्बंध - उदयानाचा वापर लग्न समारंभ, राजकीय सभा किंवा कोणत्याही खाजगी । व्यावसायीक कार्यक्रमांसाठी करता येणार नाही.

**४. देखभाल आणि खर्चाची जबाबदारी (Maintenance & Expenses).**

> संपूर्ण देखभाल झाडांचे संवर्धन, नवीन वृक्षारोपण, लॉनची निगा, खेळण्यांची दुरुस्ती आणि पदपथांची (walking track) स्वच्छता संस्थेने स्वतःच्या खर्चाने करायची आहे.
> उदयानातील मोडकळीस आलेल्या साधनांची विल्हेवाट महानगरपालिकेच्या निर्देशनात आणल्याशिवाय करता येणार नाही.

Scanned with OKEN Scanner

५. बांधकाम आणि अतिक्रमण (construction & Encroachment)-

> कायमस्वरुपी बांधकाम नाही उद्यानात कोणतेही नवीन सिमेंट कॉक्रीटचे (कायमस्वरुपी) बांधकाम करता येणार नाही. अतिशय गरजेच्या बांधकामासाठी महानगरपालिकेची लेखी परवानगी आवश्यक असेल.

६. जाहिरात आणि नामफलक (Advertisement & Branding).

> नामफलकाचा आकार संस्थेला उदयानाच्या दर्शनी भागात व आत मध्ये बोर्ड लावण्याची परवानगी असेल. मात्र उदयानाचे मूळ नाव बदलता येणार नाही. तसेच महानगरपालिका दुय्यम ठरेल अशा प्रकारे कोणताही बदल करता येणार नाही.

> व्यावसायीक जाहिरातींना बंदी उदयानात कोणत्याही प्रकारचे राजकीय, व्यावसायीक किंवा इतर जाहिरातींचे होर्डिंग्ज लावण्यास सक्त मनाई असेल.

७. पर्यावरण आणि ऑक्सीजन ऑक्सिजन पार्कचे नियम.

(Environmental rules) -

> वृक्षतोड बंदी - उदयानातील कोणतेही झाड महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय तोडता येणार नाही. स्थानीक प्रजाती ऑक्सीजन पार्कमध्ये जास्तीत जास्त प्राणवायू देणारी आणि स्थानिक प्रजातींचीच (उदा-पिंपळ, वड, कडुलिंब, बांबू इ.) झाडे लावणे बंधनकारक असेल. प्लास्टिक किंवा पर्यावरणास हानी पोहोचवणाऱ्या वस्तूंचा वापर निषिध्द असावा.

८. मालकी हक्क आणि तपासणी (Ownership & Inspection)-

> मालकी जागेचा आणि उदयानाचा अंतिम मालकी हक्क कायमस्वरुपी महानगरपालिकेचाच राहील.

> अचानक तपासणी - महानगरपालिका आयुक्त, महापौर, उपमहापौर यांनी नियुक्त केलेले अधिकारी कधीही उदयानाची पाहणी करु शकतात.

> अहवाल - संस्थेने दर वर्षी केलेल्या नियमित कार्यप्रगती अहवाल महानगरपालिकेकडे सादर करणे अनिवार्य राहील.

९. करार रदद करण्याचे अधिकार (Termination Clause) -

> कारवाईचा अधिकार - वरीलपैकी कोणत्याही अटीचे उल्लघंन केल्यास, उदयानाची दुरवस्था झाल्यास, किंवा नागरिकांच्या रास्त तक्रारी आल्यास संस्थेला नोटीस देऊन करार एकतर्फी रदद करण्याचे सर्वाधिकार महानगरपालिकेला राहतील.

> करार रदद झाल्यास संस्थेला कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मागता येणार नाही.

> करार संपुष्टात आल्यास उदयानात करण्यात आलेल्या दुरुस्ती व सुविधा महापालिकेस हस्तांतरित कराव्या लागतील.

तरी वरील प्रमाणे उद्याने व ऑक्सिजन पार्क यांच्या देखभाल व संवर्धनासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीने निश्चित केलेल्या कार्यपद्धतीस मंजुरी देणेत येत आहे.

तसेच ज्या अशासकीय संस्था महानगरपालिकेचे ऑक्सिजन पार्क / उद्याने देखभाल संवर्धनासाठी उद्याने व ऑक्सिजन पार्क देखभाल व संवर्धन समितीकडे मागणी करतील अशा अशासकीय संस्थेस ऑक्सिजन पार्क / उद्याने देखभाल संवर्धनासाठी देणेत येत असताना सदर संस्थेने वरील प्रमाणे समितीने निश्चित केलेल्या कार्यपद्धतीनुसार महापालिकेच्या उद्यान विभागाशी करार करुन देणे आवश्यक राहील.

सूचक : वि. पुं. चोपडे

अनुमोदक : ना. बा. पोवार.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०३
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ७०
दि. २०/०५/२०२६

विषय क्र. ८ : कबनुर गट नं १३३ अ २ मधील रेखांकनातील खुली जागा बगीचा, सांस्कृतीक केंद्र, व्यायामशाळा, ऑक्सिजन पार्क इ. सुविधांकरीता विकसीत करणेस तसेच भविष्यात देखभालीचा खर्च करणेस तयार असलेचे नमुद करुन सदर रेखांकनातील खुली जागा विकसित करणेस परवानगी देणे बाबत इचलकरंजी गुजराती समाज यांनी विनंती केलेबाबत कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

**ठराव**

श्री. इचलकरंजी गुजराती समाज यांनी कबनूर गट नं. १३३ अ/२ मधील रेखांकनातील खुली जागा बगीचा, सांस्कृतीक केंद्र, व्यायाम शाळा, ऑक्सिजन पार्क इ. सुविधा करीता विकसित करणेबाबत तसेच भविष्यात देखभालीचा खर्च करणेस तयार असलेबाबत नमुद करून सदर रेखांकनातील खुली जागा विकसित करणेस मान्यता मिळणेबाबत मागणी केली आहे.

कबनूर, गट नं. १३३ अ २ या जागेचे रेखांकन दि.२३/१०/१९७३ रोजी मा. सहा. संचालक नगररचना कोल्हापूर व मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी मंजूर केलेले आहे. सदर रेखांकनामध्ये उत्तर बाजूस ९२० चौ.मी. इतकी खुली जागा प्रस्तावित आहे. मिळकत पत्रिकेवर सदर खुल्या जागेचा सि.स.नं. २३९९१ अ असा असुन त्यावर नगरपरिषद इचलकरंजी खुली जागा याप्रमाणे मालकी दर्शविण्यात आलेली आहे. तसेच मिळकत पत्रिकेवर सदर खुल्या जागेचे क्षेत्र ९५९ चौ.मी. इतके दर्शविणेत आलेले आहे. त्यामुळे सदर खुल्या जागेची मिळकत पत्रिकेनुसार मालकी इचलकरंजी महानगरपालिकेची असून सदर जागा इचलकरंजी मंजूर विकास योजनेनुसार व प्रारूप विकास योजनेनुसार रेसिडेन्सीअल कम पॉवरलूम या विभागामध्ये समाविष्ट होते.

उक्त नमुद रेखांकनातील खुली जागा अर्जान्वये श्री. इचलकरंजी गुजराती समाज यांना विकसित करणेस देणेकामी धोरणात्मक निर्णय होणेसाठी कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी कबनुर गट नं १३३ अ २ मधील रेखांकनातील खुली जागा इचलकरंजी गुजराती समाज यांना महानगरपालिकेच्या खालिल अटी / शर्तीनुसार विकसित करणेस मंजुरी देणेत येत आहे.सदर ठिकाणी राजु संभाजी बोंद्रे, सदस्य यांनी केलेल्या सूचने नुसार जागेच्या एकूण क्षेत्रफळाच्या १०% जागेत गुजराती समाज यांनी सदर भागातील नागरिकांच्या सोयीसाठी अंगणवाडीसाठी २ खोल्या व श्री.गणपती मंदिर बांधकाम करुन उर्वरीत खुल्या जागेपैकी निम्या जागेत पदभ्रमण मार्ग (Walking Track) तयार करावा व शिल्लक रहाणारी खुली जागा गुजराती समाज यांनी वापरावी.

अटी / शर्ती-

१. सदरची जागा तात्पुरत्या स्वरुपात विकसनासाठी देणेत येत आहे.
२. सदर जागेचा कोणताही व्यावसायिक / व्यापारी वापर करता येणार नाही.
३. सार्वजनिक ठिकाण म्हणून सर्वांसाठी ही जागा खुली राहील.
४. बांधकाम करताना बांधकामाचे प्रारुपास नगररचना विभागाची मान्यता घेणे बंधनकारक राहील.
५. सदर खुल्या जागेचे विकास काम हे शहर विकासाशी सुसंगत असावे.
६. जागेची मालकी ही इचलकरंजी महानगरपालिकेची राहील.

सूचक : स. व. मुल्लीक

अनुमोदक : डॉ. वै. श. माहीते

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. महासभा क्र. ०३
सर्वसाधारण सभा

ठराव क्र. ७१
दि. २०/०५/२०२६

विषय क्र. ९ : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल प्रकरण ८ कराधान नियम २१ (२) नुसार इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील मिळकतींचे त्रयस्त एजन्सी मार्फत कर आकारणीचे मुल्यांकण करणेस व मिळकत धारकांना चतुर्थ वार्षिक कर आकारणीस अधिन राहुन मागणी बिले देणेस मंजुरी मिळणे बाबत कार्यालयाकडुन आलेल्या प्रस्तावाचा विचार करणे.

**ठराव**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल प्रकरण ८ कराधान नियम २१ (२) नुसार इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील मिळकतींचे त्रयस्त एजन्सी मार्फत कर आकारणीचे मुल्यांकण करणेस व मिळकत धारकांना चतुर्थ वार्षिक कर आकारणीस अधिन राहुन मागणी बिले देणेस मंजुरी मिळणे बाबत कार्यालयाकडुन आलेला प्रस्ताव वाचणेत आला.

तरी सदर विषय पुढील मिटींग समोर सादर करणेत यावा.

सूचक : [signature] स. व. कुळीक

अनुमोदक : A. P. Badake सौ. अ. पृ. बडाटे.

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]

महापौर
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner